संपूर्ण सर्वांगीण दैनिक, लोकलढ्याचा सैनिक

# लोकशाही वार्ता

epaper.lokshahivarta.in, वर्ष-४, अंक- २७९

पृष्ठे : ८ + गुड मॉर्निंग, किंमत ३.०० रुपये

शुक्रवार, २७ डिसेंबर २०१३

नागपूर

अग्रलेख : नवे गडी, नवे राज! - पान ४

मास्टर ब्लास्टरचे विक्रम अबाधित राहणार - पान ७

**स्वप्नपूर्ती**


## बनविले न बुडणारे जहाज, अपंगत्वावर केली मात

# परतवाड्यातील तरुण वैज्ञानिकाची विश्वभरारी

ललित कांबळे / परतवाडा


अपंगत्वावर मात करीत काहीतरी वेगळ करून दाखविण्याच्या जिद्दीने परतवाडा शहरातील एका २२ वर्षीय तरुणाने विज्ञान जगतात एक आश्चर्यकारक चमत्कार घडविला. त्याने न बुडणाऱ्या जहाजाची प्रतिकृती तयार करून विश्वातील अनेक वैज्ञानिकांना आव्हान दिले आहे. मात्र, त्याच्या या कल्पनेची वाहवा होण्याऐवजी शासनाने त्याची उपेक्षाच चालविली आहे.

घरातील जेमतेम परिस्थिती त्यातच साडेतीन वर्षाचा असताना डॉक्टरांच्या चुकीमुळे एका पायाने अधु झालेला परतवाडा शहरातील वरुण खंडारे हातरुण आज जगभरात नवा वैज्ञानिक म्हणून पुढे आला आहे. त्सुनामी सारख्या संकटातही हजारो प्रवाशी घेऊन जाणाऱ्या जहाजाला आता बुडण्याची भीतीच राहिली नसून छिद्र पडलेल्या जहाजात पाणी शिरल्यास ते बुडणार नाही, असा विश्वास बाळगून त्याने एका अप्रतिम प्रतिकृतीची रचना तयार केली आहे. त्यासाठी वरुण याला तब्बल आठ वर्षांची तपस्या करावी लागली. न बुडणारे जहाज बनविण्याची कल्पना सुचन्यामागे वरुणची एक कहाणीच आहे. त्याचे वडील नर्मदा नदीवरील इंदिरानगर डॅमवर नोकरीला होते. वरुण हा लहान होता तेव्हा तो वडीलासमवेत डॅमवर जायचा. डॅमवरील नाव बरेचदा नादुरुस्त राहायची. त्या



अपंगावर मात करणारा वरुण खंडारे

नावेला जेव्हा छिद्र पडून त्यातून पाणी आत शिरायचे त्यावेळी लोट्याने त्यातून पाणी बाहेर फेकावे लागत होते. त्या नावेचा केव्हा अपघात घडेल याची सतत भीती रहायची. यातून वरुणच्या डोक्यात नवी कल्पना शिरली. त्यातूनच त्याने न बुडणारे जहाज बनविण्याचा संकल्प केला. सप्टेंबर २००३ पासून



सुरुवात झालेल्या या स्वप्नपूर्तीचा प्रवास ऑगस्ट २०११ रोजीच यशस्वीरित्या संपला. या जहाजाची रचना सरळ असून जहाजाला आधार देण्यासाठी आठ बॉक्सची व्यवस्था केली आहे. त्याच्या तळाला सेंसर पॉईंट लावले आहे. त्यामुळे जहाजाला धक्काही लागला तर चटकन धोक्याची सूचना संगणकावरून मिळेल. यातील सर्व यंत्रणा ॲटोमॅटीक असून अपघात घडण्यापूर्वी ही यंत्रणा पूर्वसूचना देईल. डिझेल, पेट्रोल संपले तरी जहाज स्वयंउर्जेतून चालणार आहे, असा अफलातून शोध करून याने प्रात्यक्षिकाद्वारे साकार केला आहे. अशा अविष्कारासाठी वरूणला मोठा संघर्ष करावा लागला. ही कल्पना प्रत्यक्षात साकारताना साहित्याची जुळवाजुळव व त्यासाठी लागणार खर्च मोठ्या प्रयत्नातूनच मिळाला. याकरिता त्याला वडील, भाऊ, आई तथा बहिणीचे सहकार्य लाभले. सोबतच सुरेंद्र वाकोडे, संदीप मोहोड, सुबोध सरदार या मित्रांची तर वरूणला सर्वच क्षेत्रात भरीव मदत मिळाली. कुटुंब तथा मित्राकडून मोलाचे सहकार्य लाभल्यामुळे वरुणचा प्रवास येथपर्यंत येवून पोहचला. वरुणने बुद्धीचातुर्यातून लावलेल्या या नव्या शोधाचे १९ जून २०१२ रोजी पेटेंट रजिस्ट्रेशन झाले असून भारत सरकारच्या वेबसाईटवर १६३३-एमयुएस २०१२ या क्रमांकावर उपलब्ध आहे. त्यासाठी तुषार चव्हाण, स्वप्नील गावंडे या मित्रासह वडील, भाऊ यांनी सहकार्य केल्याचे तो अभिमानाने सांगतो. त्यासाठी ३५ हजार रुपये खर्च झाला असला तरी आज ना उद्या तो पैसा सार्थकी लागेल, अी अपेक्षा तो बाळगून आहे. दरम्यान बुद्धीमत्तेच्या जोरावर वरुणने केलेल्या या संघर्षाला शासनाने दाद द्यायला पाहीजे होती. शासनाकडून मोठ्या सहकार्याच्या अपेक्षा त्याने लावून धरली होती. परंतु, सरकारच्या असहकार्याच्या भूमिकेमुळे तो हतबल झाला आहे. या शोधाचे पेटेंट झाले असले तरी ते प्रत्यक्षात कृतीत आणण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजे आणि त्याला महाराष्ट्र त्यातही विदर्भाच्या नावाने ते ओळखल्या गेले पाहीजे, असा मानस त्याने व्यक्त केला आहे. दरम्यान वरुणला न्याय मिळवून देण्यासाठी आ. कडू यांनी पुढाकार घेतला आहे. नुकत्याच झालेल्या विधीमंडळाच्या नागपूर येथील अधिवेशनादरम्यान आ. कडू यांनी मुख्यमंत्री चव्हाण यांची भेट घेऊन त्यांना वरुणची कहाणी सांगितली. त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

### अनेकांनी उडविली खिल्ली

वरुण खंडारे हा जेमतेम १० वा वर्ग शिकलेला. त्यातही तो एका पायाने अपंग. शिवाय विदर्भाच्या मातीत जन्मलेला हा तरुण न बुडणाऱ्या जहाजाबाबत कसा दावा करू शकतो, हे सर्व अशक्यप्राय असून या प्रतिकृतीत केवळ खोटारडेपणा दिसून येत असल्याचे अनेकांनी डिवचून बोलले. त्याचा हा दावा हास्यास्पद असल्याचे अनेकांनी सांगितले. यावेळी अनेकांनी त्याचा आत्मविश्वास कमी करण्याचा प्रयत्न केला. कित्येकदा खिल्लीसुद्धा उडविल्या गेली. मुंबईसारख्या ठिकाणी या प्रतिकृतीचे प्रात्यक्षिक देताना वरुणच्या पाठीवर शाबासकीची थाप देण्या ऐवजी अनेकदा अपमानीत व्हावे लागल्याचे तो दुःखी मनाने सांगतो. परंतु त्यातून बळच मिळत गेल्याने मी यशस्वी झाल्याचे त्याने बोलून दाखविले.

# अमरावती live

देशोन्नती बुधवार दि.३ सप्टेंबर २०१४


न ६ क

ूमीवर उपरोक्त ६ हे. सदर कर्मचाऱ्यांनी गात सेवा दिली आहे. खंडे यांनी मे २०१४ ंच्या बदल्यांचे आदेश बदल्यांचे आदेश प्राप्त नगाव , मोहिते व ल्ह्यात बदली देण्यात गात सेवा देणाऱ्या सदर

# अन् तेव्हा वरुण असता, तर टायटॅनिक बुडाले नसते!

## अचलपूरच्या संशोधकाने बनविले जहाज न बुडण्याचे सयंत्र

*हरिश्चंद्र खुजे / २ सप्टेंबर*

**परतवाडा** : शहरात एका टपरीवजा दुकानात इलेक्ट्रिक उपकरणे दुरुस्त करणाऱ्या एका २७ वर्षीय अपंग युवकाने न बुडणारे जहाजाचे संशोधन केल्याचा दावा केला आहे. त्याने तयार केलेल्या मॉडिलचे प्रात्याक्षिक यशस्वी झाल्याने या दाव्याला बळकटी प्राप्त झाली आहे. इतकेच नव्हे, तर त्याला संशोधनाचे पेटंटसुद्धा मिळाले आहे. वरुण मधुकर खंडारे असे या संशोधनकर्त्या युवा शास्त्रज्ञाचे नाव आहे. या संशोधनाला प्रत्यक्षात उतरविण्यासाठी आता त्याला शासनाकडून मदतीची अपेक्षा आहे. त्यासाठी वरुणला रात्रंदिवस संघर्ष करावा लागत असून त्याला आपले संशोधन विश्वासार्ह असल्याचे पटवून देण्यासाठी धडपड करावी लागत आहे.

आजाराने जायबंदी झाल्याने वरुण अपंगत्वाचे जिणे जगत आहे. नर्मदा नदीमध्ये नावेतून तो वडिलांसोबत फेरफटका मारायचा. अपंग असल्याने त्याला जल प्रवासाची भीती वाटायची. अन्य कारणाने नाव बुडाली तर अन्य सहकारी पोहून आपला जीव वाचविण्याचा प्रयत्न करतील, पण मी अपंग असल्याने मला मरावेच लागेल, अशी भीती त्याला सतत भेडसावत होती आणि या भीतीनेच त्याच्यामधील संशोधक जागा झाला. जहाज बुडायलाच नको, त्सुनामीच्या लाटामध्येही जहाज तरंगतच राहिले पाहिजे, यासाठी वरुणची धडपड सुरू झाली. १३ व्या वर्षी वरुणने एक मॉडेल तयार केले. मॉडिलला एक सयंत्र बसविले आणि चक्क छिद्र पडलेले जहाजाचे मॉडिल पाण्यावर तरंगायला लागले. शाळा शिकत असताना वरुणचे संशोधन पुढे जात होते. त्यानंतर आयटीआयचे प्रशिक्षण घेत असताना वरुणला संशोधन करताना मदत झाली. आजच्या घडीला वरुणचे संशोधन पूर्ण झाले.

आपल्या संशोधनाबद्दल आत्मविश्वास बळावल्याने प्रत्यक्षात देशविदेशातील जहाजाला आपले सयंत्र लागले पाहिजे, यासाठी वरुणची सारखी धडपड सुरू आहे. वरुणने आपले संशोधन सर्वप्रथम शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात दाखविले; परंतु आयटीआयचा विद्यार्थी असे संशोधन करूच शकत नाही, अशी खिल्ली उडविली गेली. त्यानंतर माजी राष्ट्रपती अब्दुल कलाम यवतमाळला युवा शास्त्रज्ञांना प्रेरीत करण्यासाठी येणार असल्याचे वरुणला कळले. वरुणने सदर कार्यक्रमाची प्रवेश पाससुद्धा मिळविली; परंतु त्याला मात्र गेटवरच अडविण्यात आले. ना.सुरेश शेट्टी, खा.मिलिंद देवरा, खा.प्रिया दत्त यांनासुद्धा वरूण भेटला; परंतु तो वैदर्भीय आहे म्हणून त्याची निराशा झाली. त्यानंतर त्याने शिपिंग कॉर्पोरेशनशीसुद्धा संपर्क साधला.

### नितीन गडकरींच्या भेटीने उत्साह

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची वरुणने भेट घेऊन तब्बल १५ मिनिटे चर्चा केली. भूषण कोंडे यांनी भाजपा जिल्हाध्यक्ष प्रकाश भारसाकळे यांच्यामार्फत सदर भेट घडून आली. त्यामुळे मुंबई येथील अपंगांच्या मेळाव्यात वरुणचे मॉडेल ठेवले गेले. त्यामुळे वरुणच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.



संशोधन करणाऱ्या अपंग वरूण समवेत मित्र परिवार

### अचलपूरचे नाव जगात झळकणार

शासनाने वरुणच्या संशोधनावर विश्वास ठेवून त्याला सहकार्य केले आणि त्यामध्ये त्याला यश आले, तर संशोधनाच्या क्षेत्रात ती एक फार मोठी घटना ठरणार आहे. इतकेच नव्हे, तर जगात अचलपूरचे नाव झळकणार आहे.


CMYK

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

संस्थापक- स्व. ब्रजलालजी बियाणी

जूनं ते सोनं

# मातृभूमि

• संपादक- अनिल अग्रवाल

## जेथे दैवही ओशाळते...

# वरूणचा नवा अविष्कार...'शिपा सेफ्टी डिवाईस'



### हवा मदतीचा हात....



पेटंट मिळवण्यासाठी आतापर्यंत वरूणला ३५ हजार रूपये खर्च आला. आप्तस्वकियांच्या मदतीने त्याने हा महाकाय रथ ओढला, तरी आता पुढील वाटचालीसाठी त्याला गरज आहे आर्थिक पाठींब्याची. आपले हे जगावेगळे डिवाईस व्यापारी जगतासमोर आणायला तो धडपडत आहे. आपल्या दुर्दम्य इच्छा शक्तिने अपंगत्वावरही मात करणा-या विजिगिषु वरूणला मदत करण्यासाठी वा डीवाईसच्या इत्यंभूत माहितीसाठी ९९७५६४२८०३ या क्रमांकावर तसेच vkhandare03 @gmail. com. या ई-मेल वर संपर्क करण्याचे आवाहन वरूणने केले आहे.

'अनंत अमुची ध्येयासक्ती अनंत अन् आशा, किनारा तुला पामराला'. जगरहाटीला निघालेल्या कोलंबसची जिद्द कागदावर उतरविणाऱ्या माधव ज्युलियन यांनी या ओळीमधून सळसळत्या मराठी रक्ताच्या हातात जणु एक बालसुर्यच सोपविला. त्याच बालसुर्याच्या तेजाचे एक किरण पकडून अथांग सागरावर हुकूमत गाजवायला सज्ज झालेल्या परतवाड्याच्या वरूण खंडारे या तरूणाने आविष्कार केला आहे, 'शिप सेफ्टी डिवाईस' चा. जलप्रवासादरम्यान वरूण राजाची अवकृपा झाली किंवा अपघाताने जहाजाला छिद्र पडून पाणी आत शिरले तरी तुमच्या प्रवासात खंड पडणार नाही, अशी व्यवस्था वरूण खंडारेने तयार केलेल्या या शिप सेफ्टी डीवाईस मध्ये आहे. अत्यंत गरीब परिस्थितीत आपल्या अपंगत्वावर मात करून वरूण ने वर्षाच्या अथक परिश्रमातून हे डिवाईस साकारले. या दरम्यान त्याने अनेक प्रयोग केले. सुरवातीला यासाठी मुख्यत्वे थर्माकॉल वापरले. पण काही प्रयोगानंतर थर्माकॉलची मर्यादा लक्षात आल्यावर त्याने सेफ्टी डिवाईसचे मुख्य पार्ट्स बनविण्यासाठी रबरचा वापर केला.

शब्दांकन
सौ. आशा फुसे

मध्यप्रदेशातील नर्मदा नदीच्या इंदिरासागर डॅमवर वडील कार्यरत असतांना वरूण नेहमी आपल्या मित्रासमवेत नौका नयनाचा आनंद घेत असे. या दरम्यान अनेक जहाजांना छिद्र पडून, दगडांशी किंवा एकमेकांशी टक्कर होऊन अपघात झाल्याचे त्याला आढळले. अश अपघातात अनेक वेळा प्रचंड नुकसान, प्रसंगी जिवीतहानी झाल्याने संवेदनशील वरूणचे मन हळहळले. मग त्याने यावर उपाय शोधण्याचा चंगच बांधला आणि ९ वर्षाच्या अथक परिश्रमातून अविष्कार झाला.

**'शिव सेफ्टी डिवाईसचा'**

वरूणने तयार केलेली ही यंत्रणा जहाजात बसवली, आणि कधीकाळी जहाजाला छिद्रही पडले तरी ते बुडणार **पान २ वर**

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

दैनिक
# दिव्य मराठी
दैनिक भास्कर समूहाचे मराठी वृत्तपत्र
एकूण पाने १२+४=१६ | किंमत ₹ ३.००




divyamarathi.com गुरुवार अमरावती १२ सप्टेंबर २०१३

सेरेनावर चढला प्रेमाचा रंग . १०

# अपंगत्वावर मात करून या तरुणाने साकारले न बुडणारे जहाज

भूषण काळे | अमरावती

जिद्द, चिकाटी काय असते, हे वरुण मधुकर खंडारे याच्याकडे बघितल्यावर कळते. अपंगत्वावर मात करून या २२ वर्षीय तरुणाने न बुडणारे जहाज तयार केले आहे. इतकेच नव्हे तर त्याचे पेटंट घेऊन जेमतेम शिक्षण घेतलेल्या या तरुणाने अनेकांपुढे नवा आदर्श ठेवला आहे. डॉक्टरच्या चुकीमुळे वरुणचा एक पाय बालपणी अधू झाला. अपंगत्वाचे रडगाणे गाण्यापेक्षा त्याने काहीतरी वेगळं करण्याचा चंग बांधला. त्यातूनच त्याने न बुडणारे जहाज तयार केले. त्सुनामीतही हे जहाज तुटले तरी बुडणार नाही. टायटॅनिकलाही या 'सेफ्टी डिव्हाइस'ची जोड मिळाली असती, तर ती दुर्घटना टळली असती, असा विश्वास त्याने व्यक्त केला.



## जहाजाच्या स्वप्नपूर्तीचा प्रवास

| कामाची सुरुवात | काम पूर्णत्वास | पेटंट नोंदणी |
|---|---|---|
| सप्टेंबर 2003 | ऑगस्ट २०११ | २ जून २०१२ (मुंबई) |

**पेटेंट प्रकाशित : १९ जून २०१२**

वरूणने तयार केलेल्या जहाजाला खालच्या बाजुने छीद्र पडले तरी ते बुडणार नाही, अशीच जहाजाची रचना आहे. जहाजाला आधार देण्यासाठी त्याने आठ बॉक्सची व्यवस्था केली आहे. तळाला सेंसर पॉइन्ट लावले आहेत. त्यांमुळे जहाजाला धक्का ही लागला तर चटकन संगणकावर सूचना मिळेल. त्यासाठी सर्व यंत्रणा ॲटोमॅटिक आहे. अपघात घडण्यापूर्वी ही यंत्रणा पूर्वसूचना देईल. डिझेल, पेट्रोल संपले तरी जहाज स्वयंऊर्जेतून चालेल.

## असे झाले पेटंट रजिस्ट्रेशन

या अविष्काराचे वरूणने पेटंट मिळविले आहे. त्याच्या पेटेंटचा क्रमांक १६३३-एम यु एम-२०१२ हा असून भारत सरकारच्या वेबसाइटवरही उपलब्ध आहे. ३५,००० रूपयांचा खर्च आला. ही रक्कम जुळविण्यासाठी त्याला वडिल, भाऊ व पेटेंट करुन देणारे तुषार चव्हाण, स्वप्नील गावंडे यांचे सहकार्य लाभले.

**साहित्याची जुळवाजुळव:** बहुतेक साहित्य हे परतवाडा येथील बाजारपेठेतूनच मिळाले. साहित्य खरेदीसाठी ४०० रुपये मोजावे लागले.

**यांची झाली मदत:** साहित्यांची तसेच पैशांची जुळवाजुळव करतांना वडिल, भाऊ तसेच आईचे सहकार्य लाभले. आईने प्रोत्साहन देऊन वेळोवेळी मदत केली.

## अशी सुचली जहाजाची कल्पना

नर्मदा नदीवर असलेला इंदिरासागर डॅमवर वडील नोकरीवर असतांना अनेक जहाज नादुरुस्त राहत होते. बरेचसे जहाजाला छिद्र असल्याने नावेतून जात असतांना लोट्यातून पाणी बाहेर फेकावे लागायचे. मुख्य बाजारपेठत जायला नावेचाच आधार घ्यावा लागत होता. त्यामुळे पडीत जहाजातून केव्हा अपघात घडेल याची भीती होती. त्यामुळे छिद्र पडल्यावरदेखील बुडणार नाही, असे जहाज बनविण्याची कल्पना सुचली.

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

# नवा काळ

मुंबई ■ मंगळवार, २१ ऑक्टोबर २०१३ ■ पान-९


## अमरावतीच्या अपंग वरुणने साकारले न बुडणारे जहाज

ठाणे, ता. २८ – जेमतेम शिक्षणाच्या शिदोरीवर अंपगतत्वावर मात करून अमरावती येथील २२ वर्षीय तरुणाने चक्क न बुडणाऱ्या जहाजाची संकल्पना प्रत्यक्षात आणली आहे. वरुण खंडारे असे त्याचे नाव असून त्याने या अविष्काराचे पेटंटही मिळवले आहे. त्यामुळे जलसफर करणाऱ्यांना त्सुनामी अथवा इतर नैसर्गिक आपत्तीमध्ये दिलासा मिळेल असा दावा खंडारे याने केली आहे. शिप सेफ्टी डिवाईस असे या संकल्पनेचे नाव असून याचा प्रत्यक्ष वापर होण्यासाठी वरुणला शासकीय मदतीची आशा आहे.

अमरावती, परतवाडा परिसरात राहणाऱ्या वरुणचा एक पाय बालपणी डॉक्टरच्या चुकीच्या औषधोपचाराने कायमचा अधू झाला. मात्र अपंगत्वाचे रडगाणे न गाता त्याने जिद्द व चिकाटीने २००३ सालापासून संशोधणास सुरुवात केली. गावी बाजाराला जाताना बोट अथवा नावेतून जावे लागते. त्यातूनची ही कल्पना जन्मली. वरुण सांगत होता. २०११ साली त्याच्या या उपक्रमाला यश आले. त्याने साकारलेले शिप सेफ्टी डिवाईसची नोंदणी २ जून २०१२ रोजी मुंबईत केल्यानंतर भारत सरकारने याचे पेटंट दिले.

वरुणने तयार केलेल्या जहाजाला खालच्या बाजूने छिद्र पडले तरी ते बुडणार नाही. अशी जहाजाची रचना असून यासाठी जहाजात आठ बॉक्सची व्यवस्था बनवली आहे. तळाला सेन्सर पॉईंट लावले असल्याने जाहाजाला धडकही लागली तर चटकन संगणकावर सूचना मिळेल. अपघात व दुर्घटनेपूर्वी ही यंत्रणा पूर्वसूचना देईल किंबहूना इंधन संपले तरीही स्वयंऊर्जेवर जहाज चालेल असा दावा वरुण याने केला आहे..



परदेश वृत्त

...तील सर्वात मोठे विमानतळ

...ई, ता. २८– दुबईत अल-मागतोस हे ...न सर्वात मोठे विमानतळ उभारण्यात येत ...या विमानतळावरील प्रवासी वाहतुकीचे ... संपन्न झाले. या विमानतळात ...वपट्ट्या उभारण्यात येत आहेत. या ...ठात दरवर्षी सोळा कोटी प्रवाशांची ... करण्याची क्षमता आहे. त्याचबरोबर ...नतळातून दरवर्षी १ कोटी २० लाख ...ची मालवाहतूक होऊ शकते. या ...चे काम आता पूर्णत्वाकडे नेण्यात

...ने पेट घेतला! ३ ठार

... ता. २८– बीजिंगच्या ऐतिहासिक ...सरात आज दुर्घटना घडली. एक मोटार

(वृत्तसंस्था) ...लशास्त्रज्ञ ...लिके च्या ...सून सुमा... ...र्षे दूर अंतराव... ...ाचा दावा केला ... ...ह्मांडाच्या अथांग ... अस्तित्वात असल्या... ...र्यंत अनेकदा व... ...यापैकी काही चंद्र... ...ायोग्य वातावरण ... ...ा करण्यात आला. मात्र, ... या दाव्यांना दुजोरा देणारा ...नजून लागला नाही. त्यानंतर ...खगोलशास्त्रज्ञांनी एका दुरस्थ ...नोवती फिरणारा नवा ग्रह ...चा चंद्र शोधल्याचा दावा ...आहे. आतापर्यंत ताऱ्यापासून ...र्तित होणाऱ्या प्रकाशाचे ...षण करून जवळपास १ ...ग्रहांचा शोध लावण्यात आला

एक बॉम्ब अलेप्पो मीडिया सेंटरबाहेरील एका प्रवासी ... घेण्याची धमकी दिली. एवढ्या थंडीतही युद्धाची


फ्लाईट ... पिंगसाठी ... 9619088870 ... मुले/मुली ... पगार ६००० ... (9920793413) ... घरकाम ... सांभाळण्यासाठी ... वय १८-२५ ... 9619940203 ... मुले पाहिजेत ... MODI ... 2nd FLOOR ... FORT ... 104

भारत सरक... १०/१२ पास ... रु. १००० ... प्रॅक्टीकल नर्सिंग, डी एम... एक्स-रे, डेंटल, एम.अ... शिकतानाच ... २,००,... १०० % ... डॉ. गायकवा... ● २०३, आकांक्षा, ... स्टेशनजवळ, ... Website ...



Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

अमरावती भास्कर

नागपुर· शुक्रवार 27 सितंबर 2013 | अमरावती

दैनिक भास्कर

अमरावती आसपास

# मल्टीनेशनल कंपनी में काम करने की इच्छा

## » विकलांग युवक ने बनाया पानी में नहीं डूबने वाला जहाज

**ब्यूरो** | अमरावती

समाज में विकलांगता को अभिशाप माना जाता है, लेकिन इसी विकलांगता पर मात पाते हुए वरुण मधुकर खंडारे नामक विकलांग युवक ने पानी में नहीं डूबने वाला जहाज बनाया है। इतना ही नहीं उसने जहाज का पेटेंट भी तैयार किया है। कम पढ़े-लिखे वरुण ने नया संशोधन कर समाज के सामने एक नया आदर्श स्थापित किया है। वरुण ने बताया कि वह मल्टीनेशनल कंपनी से जुड़कर देश की सेवा करना चाहता है। बचपन से ही वरुण खंडारे को विकलांगता के चलते समाज की उपेक्षा, लोगों के ताने, जैसी कई समस्याओं से जूझना पड़ा। चिकित्सक की लापरवाही से अपना एक पांव गंवा चुके वरुण ने कभी भी विकलांगता को अपनी कमजोरी नहीं माना. अपितु उसने इसे ढाल बनाते हुए कुछ नया करने की ठान ली। इसी दृढ़ निश्चय से वह पानी में नहीं डूबने वाला जहाज बनाया पाया, जो सुनामी आने पर भी डूब न पाए। वरुण ने पानी में नहीं डूबने वाले जहाज को बनाने की शुरुआत सितंबर 2003 से की। अगस्त 2011 में काम पूरा हुआ। इसके बाद वरुण ने जहाज का 2 जून 2012 में मुंबई में पेटेंट पंजीयन कराया। 19 जून 2012 में उसका पेटिट प्रकाशित हुआ। उसके पेटेंट का क्रमांक 1633 एमयूएम-2012 है। यह पेटेंट भारत सरकार की वेबसाइट पर भी उपलब्ध है। इस जहाज की खासियत यह है कि यदि इसके निचले हिस्से में छेद आ भी जाए, पर वह जहाज को डुबा नहीं सकता। जहाज में सहारा देने वाले आठ बॉक्स बनाए गए हैं। तल को सेंसर प्वाइंट लगाया गया है। इससे दुर्घटना होने की संभावना की पूर्व जानकारी मिलेगी। पेट्रोल खत्म होने के बाद भी जहाज स्वयं ऊर्जा से चलेगा।



### जहाज बनाने की कल्पना

नर्मदा नदी पर स्थित इंदिरासागर डैम पर वरुण के पिता नौकरी करते थे। इस दौरान अनेक बोट नादुरुस्त रहती थी। अनेक नावों को छेद होने से बोट लेकर जाते समय तपेले से पानी बाहर निकालना पड़ता था। मुख्य बाजार में जाने के लिए बोट का सहारा लेना पड़ता था, लेकिन इस वक्त कब अनहोनी हो जाए, यह कहा नहीं जा सकता था। इसी अनहोनी को टालने के लिए पानी में नहीं डूबने वाले जहाज बनाने की संकल्पना तैयार की। जहाज बनाने के लिए अधिकांश सामग्री परतवाड़ा बाजार से खरीदी गई। सामग्री खरीदी करने के लिए रुपए का जुगाड़ पिता, भाई और मां के सहयोग से हो पाया।

### मिला सहयोग

वरुण ने बताया कि, इस प्रोजेक्ट को बनाने के लिए शासकीय सेवा में कार्यरत सुरेंद्र ने उसकी सहायता की। एड. स्वप्निल गावंडे और एड. तुषार चव्हाण का भी सहयोग रहा। संदीप मोहोड़, अश्विनी खंडारे, रवि मुल्लार, रतन और राहुल का भी प्रोत्साहन मिला।

### पारिवारिक पृष्ठभूमि

राहुल के पिता कृषि विभाग में काम करते थे, जो सेवानिवृत्त हैं। माता गृहकार्य में व्यस्त रहती हैं। वरुण की परतवाड़ा में छोटी से इलेक्ट्रॉनिक की दुकान है। वह मल्टीनेशनल कंपनी से जुड़कर देश की सेवा करने की इच्छा रखता है।

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

### न बुडणाऱ्या जहाजाचे पेटंट मिळविणाऱ्या वरुण खंडारेची अपेक्षा

# ना.गडकरी संशोधनाची दखल घेतील का?

**अमरावती**
दि.९ (प्रतिनिधी)

अपंगत्वावर मात करुन परतवाडा येथील वरुण खंडारे या २२ वर्षीय युवकाने न बुडणाऱ्या जहाजाचा फॉर्म्युला तयार केला. विशेष म्हणजे त्याच्या फॉर्म्युलाला पेटंटसुध्दा मिळाले. परंतु शासकीय स्तरावरुन त्याच्या संशोधनाला अद्यापही मदतीचा हात मिळाला नाही. त्यामुळे वरुणचा संघर्ष सुरुच आहे. आज केंद्रीय मंत्री नितीन गडकरी राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाच्या उद्घाटनाला अमरावतीत येत असून ना.गडकरी आपल्या संशोधनाची नक्कीच दखल घेतील अशी भावना वरुणने व्यक्त केली.





वरुण खंडारे याने ना.गडकरी यांना यापुर्वी संशोधनाची माहिती दिली.

वरुणच्या घरची आर्थिक परिस्थिती जेमतेम असून तो साडेतीन वर्षांचा असताना डॉक्टरांच्या चुकीमुळे तो एका पायाने अपंग झाला. त्याचे वडील मध्यप्रदेशातील नर्मदा प्रकल्पावर कार्यरत होते. नदी किनारीच वाढलेल्या वरुणने न बुडणारे जहाज निर्माण करण्याचा ध्यास बालपणापासूनच घेतला. कित्येक वर्षांच्या जिद्दीने केलेले प्रयत्न आणि ८ वर्षांचे संशोधन त्यातून त्याने छिद्र पडलेल्या जहाजात पाणी शिरुनही ते बुडणार नाही अशा मॉडेलची निर्मिती केली.

वडीलांच्या सेवानिवृत्तीला मिळालेला निधी संशोधनामध्ये खर्ची पडला. त्यानंतर पेटंट घेतानाही प्रचंड खर्च झाला. आपल्या संशोधनाची दखल घेऊन शिपिंग कंपन्या असे जहाज निर्माण करतील या त्याच्या विश्वासाला मात्र शासकीय अनास्थेमुळे धक्का लागला. अध्यापही शासकीय स्तरावर वरुनच्या संशोधनाची दखल घेण्यात आलेली नाही.

विशेष म्हणजे ना.नितीन गडकरी यांची त्याने भेट. घेऊन आपल्या संशोधनाची माहिती दिली होती. आता नितीन गडकरी यांच्याकडेच जहाज बांधणी विभाग असल्यामुळे आपल्या संशोधनाची ना.गडकरी नक्कीच दखल घेतील अशी आशा त्याने व्यक्ती.

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

महाराष्ट्र टाइम्स
The Maharashtra Times -Breaking news, views. reviews, cricket from across India

## 'तुफानो सें खिंच लायेंगे कश्ती को'

Dec 23, 2013, 01.30AM IST

0 Recommend 0 Tweet 0 8+1 Comments

Sikkim Manipal University
Ranked No.1 in Distance Education. EduNxt Online Learning Platform! : smude.edu.in/Admissions_Ope

महाराष्ट्र टाइम्स दि० 23-12-2013 (नागपूर (विशेष))

## 'तुफानो सें खिंच लायेंगे कश्ती को'


### जहाजाला बुडण्यापासून वाचविण्याचे मेकॅनिझम, विदर्भातील अपंग मुलाची पेटंटसाठी नोंदणी

म.टा. प्रतिनिधी ■ नागपूर

'ए शिप इज सेफ इन द हार्बर, बट दॅट्स नॉट व्हॉट शिप्स आर फॉर', अशी म्हण इंग्रजित प्रचलित आहे. वादळांना घाबरून बंदरावरच राहण्यासाठी जहाजे बनत नाहीत, त्यांना वादळांचा सामना करावाच लागतो.

**लेने को तो साहिल का सुकून भी ले सकते हैं,**
**पर कश्ती को तुफानो से निकालने का मज़ा ही कुछ और है !**

या ओळींना जागत जिद्दीच्या भरवशावर जहाजांचा वादळांशी असलेला सामना सुकर करण्यासाठी विदर्भातील एका युवकाने विशेष आणि अत्यंत स्वस्त असे तंत्रज्ञान विकसित केले आहे.





वरुण खंडारे

**■ संकल्पना**

वादळादरम्यान जहाजात पाणी शिरल्यास जहाजातील सबमर्सीबल पंम्पाच्या साहाय्याने हे पाणी काढण्यात येईल. अपघात मोठा असल्यास जहाजाची खालची बाजू तुटून जहाज बुडण्याचा धोका वाढतो. मात्र या जहाजाच्या भागात दोन्ही बाजुंनी प्रत्येकी आठ एअर बॅग्स लावण्यात येतील. जहाजातील इंधन संपल्यावरसुद्धा या बॅग्सच्या साहाय्यावर हे जहाज तरंगू शकेल, असा दावा वरुण खंडारे यांनी केला आहे.

**■ बिना डिझेल दौडेगा ज़हाज**

जहाजातील इंधन संपल्यावरसुद्धा जहाज आपल्या गंत्यव्यापर्यंत पोहोचू शकेल अशी व्यवस्था वरुणने केली आहे. वरच्या भागाला लावण्यात आलेल्या यंत्राद्वारे पवन ऊर्जेच्या साहाय्याने हे जहाज आपल्या गंत्यव्यापर्यंत पोहोचेल, असे वरुणने सांगितले.

**■ संकल्पनेत नवे काय?**

वादळात जहाजाला बुडण्यापासून वाचविण्यासाठी जगात विविध तंत्रज्ञान उपलब्ध आहेत तसेच नवीन संशोधनसुद्धा सुरू आहेत. मात्र आपले तंत्रज्ञान हे अत्यंत स्वस्त असून ऑपरेट करायलासुद्धा सोपे असल्याचा दावा वरुणने केला आहे.

**■ पोलिओग्रस्त वरुणला पेटंट**

परतवाड्यात राहणाऱ्या वरुणला वयाच्या तिसऱ्या वर्षी पोलिओने ग्रासले. आयटीआय शिक्षित वरुण आता परतवाड्यात एक मेकॅनिकल आणि इलेक्ट्रिकलचे छोटेसे दुकान चालवितो. या संकल्पनेसाठी वरुणला पेटंट मिळाल्याची माहिती त्याने दिली.

**■ पेटंटसाठी पैसा नव्हता**

पेटंट फाइल करण्यासाठीसुद्धा वरुणकडे पैसे नव्हते. त्यासाठी त्याचे मित्र सुरेंद्र वाकोडे आणि संदीप मोहोड यांनी त्याला मदत केली. मात्र तूर्तास ही केवळ एक संकल्पना आहे. ती वास्तवात उतरावी म्हणून अचलपूर मतदारसंघाचे आमदार बच्चू कडू यांनी त्याला हिवाळी अधिवेशनादरम्यान नागपुरात आणले. परंतु इथे काम जमले नाही. आपली संकल्पना मुख्यमंत्री दरबारी मांडण्यासाठी त्याला मुंबई गाठावीच लागणार आहे.

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

न बुडणारे जहाज...

# ध्येयवेड्या अपंग तरूणाचा अविष्कार

## पेटंटला सरकारची मान्यता

(शरद गढीकर)

अमरावती, दि.१३

त्याचे वय २६ वर्ष...दुसऱ्याच्या चुकीमुळे बालपणी आलेल्या अपंगत्वाचा भार सोसत तो जीवन जगत आहे. मात्र सर्वसामान्यांसारखा तो हारला नाही की कुढत बसला नाही. त्याचे शिक्षणही जेमतेमच. मात्र काही तरी नवे करावे या कल्पनेने तो भारवला, कामाला लागला...नऊ वर्ष सातत्याने या ध्येयवेड्याने आपले



वरुण मधुकर खंडारे

कार्य सुरू केले व एक इतिहास घडवीला. न बुडणारे जहाज हे त्याच्या नवनिर्मीत इतिहासाचे नाव...तर वरूण मधुकर खंडारे असे या इतिहासनिर्माण करणाऱ्या ध्येयवेड्या तरूणाचे नाव. या अविष्काराचे पेटंट त्याने सरकार करून मिळवीले आहे व लवकरच त्याच्या या प्रयोगाला जगाची मान्यता मिळणार आहे.

(उर्वरित पान २ वर)

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

# रिजन चेअरपर्सन सुभाष राठी ह्यांचा याव

अमरावती (प्रतिनिधी) लॉयन्स क्लबव्दारा संचालित आदर्श बालवाडी यावली शहीद येथे सुभाष राठी ह्यांची रिजन चेअरपर्सनपदी निवड झाल्याबद्दल डॉ. गोविंद कासट समाजसेवक सुनिल चौधरी अध्यक्ष ह्यांच्या हस्ते शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

## *(पान १ वरुन) न बुडणारे....*

जहाजाला खालच्या बाजुने छिद्र पडले किंवा त्सुनामी जरी आली तरीही वरूण ने तयार केलेले जहाज बुडणार नाही असा नविन शोध त्याने लावला आहे. विषेश म्हणजे त्याच्या या शोधाची दखल घेत त्याला या शोधाचे पेटंट ही मिळाले आहे. आता तो आपल्या कल्पकतेला वास्तविकतेचा आयाम देण्यासाठी धडपडतो आहे. एका पायाने पुर्णतः अपंग असलेला वरूण साडेतिन वर्षांपर्यंत सर्वसामान्यांसारखा चालता-फिरता होता. या वयात त्याला पोलीओने ग्रासले. डॉक्टरांनी चुकीचे इंजेक्शन दिल्याने त्याचा एक पाय कायमचा निकामी झाला. व चालता-फिरता वरूण एका पायाने अधू झाला. मात्र या अपंगत्वावर कुढत बसत आपल्या नशिबाला दोष देत वरूण थांबला नाही.जीवनात काही तरी वेगळे करावे असा चंग त्याने बांधला. १२ वी विज्ञान शाखेपर्यंत शिक्षण त्याने घेतले. मात्र पुढे हलाकीची स्थितीमुळे त्याने स्वयंरोजगार मिळविण्याच्या दृष्टीने आयटीआय मधून इलेक्ट्रानिक्स केले. त्यानंतर त्याने परतवाडा येथे रतन इंदौर नावाचे इलेक्ट्रानिक्सचे दुकान उघडले. या दुकानात टिव्ही, मोबाईल, टेप दुरूस्ती करीत असतांना मात्र मनात काही तरी नविन करण्याची प्रबळ इच्छा वरूणला स्वस्त बसू देईना त्यामुळे त्याने सन २००३ मध्ये न बुडणारे जहाज निर्माण करण्याचा निश्चय केला. या ध्येयापोटी वेड्या झालेल्या वरूण ने या प्रयोगाला वास्तविकतेत उतरविण्यासाठी आपले दहा वर्ष खर्च केले. अखेर त्याला यश मिळाले व सन २०१२-१३ मध्ये त्याच्या हातून एक भव्यदिव्य असे न बुडणारे जहाज ही कल्पना प्रत्यक्षात साकार झाली.

आज वरूण ने दै.हिंदुस्थानच्या कार्यालयात भेट दिली. दै.हिंदुस्थानचे प्रबंध संपादक विलास अ.मराठे यांनी त्याचे स्वागत व कौतूक केले. या भेटीदरम्यान वरूण ने आपला हा अविष्कार व त्याची पाश्वभूमि विषद केली. एका मनातील कल्पनेला मी प्रत्यक्षात उतरविले. कोणतीही शैक्षणिक पात्रता नसतांना केलेला हा नवअविष्कार होता. आपण अपंग असल्याने व बाहेरश्या जगाशी जास्त संपर्क नसल्याने खूप अडचणी येत असल्याचे वरूण ने सांगीतले. टायटानिक बुडाले तेव्हा जर हा अविष्कार असता तर ते वाचूही शकले असते असे वरूण म्हणाला. या अविष्काराला सर्व जगासोमोर आणने व जिल्ह्याचे तथा आपल्या देशाचे नाव मोठे करणे हे आपले पुढचे ध्येय असल्याचे वरूण खंडारे याने स्पष्ट केले.

### जहाजाची कल्पना...

खंडव्यातील नर्मदा नदीवरील इंदीरासागर येथील धरणावर वरूण चे वडील मधुकरराव हे चतुर्थ श्रेणी कर्मचारी. त्यामुळे वरूण चा संपूर्ण परिवार या धरणाच्या जवळच रहायचा. धरणावर अनेक ना-दुरूस्त जहाज राहत होते. बरेसश्या जहाजाला छिद्र पडले असल्याने नावेतून जात असतांना आतील पाणी हाताने काढून फेकावे लागत असे. धरणावरून गावात जायचे असल्यास बोटीचा सहारा घ्यावा लागत असे. त्यामुळे या छिद्र पडलेल्या जहाजाला केव्हा अपघात होईल हे सांगता येत नव्हते. वरूण हे सर्व नेहमी बघायचा व हे रोखण्यासाठी आपल्याला काही तरी वेगळे करता येईल का हा विचार करायचा. छिद्र पडल्यावर देखील जहाज बुडणार नाही असे जहाज निर्माण होईल का अशी कल्पना त्याच्या मनात आली व या कल्पनेला वास्तविकतेत उतरविण्यासाठी तो कामाला लागला.

### पेटंट रजिस्टेशन...

या अविश्काराचे पेटंट वरूण ने आपल्या नावावर मिळवीले आहे. त्याच्या पेटंटची माहिति भारत सरकारच्या वेबसाईटवरही उपलब्ध आहे. त्याला पेटंट मिळविण्यासाठी त्याचे जिवाभावाचे मित्र सुरेंद्र वाकोडे, तुषार चव्हाण, स्वप्निल गावंडे, अश्विनी खंडारे, रवि मुल्लार, संदीप मोहोड, सुबोध सरदार यांचे सहकार्य लाभले.

### असा हा अविष्कार....

वरूण ने तयार केलेल्या जहाजाची रचनाच अशी आहे [illegible], त्या छिद्र पडले तरी ते बुडणार नाही. त्यासाठी त्याने आठ बॉक्सची व्यवस्था केली आहे. तळाला सेंसर पॉईन्ट लावले आहे. त्यामुळे जहाजाला धक्का लागला तरी संगणावर याची सूचना क्षणात मिळू शकेल. डिझेल, पेट्रोल संपले किंवा त्सुनामी जरी आली तरी हे जहाज स्वयंउर्जेतून चालू शकेल.

### लोकप्रतिनिधींची कमालीची अनास्था

आपला अविष्कार जगासमोर यावा व शहरासह भारताचे नाव व्हा याकरीता या प्रयोगाला आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्यासाठी वरूण प्रयत्नरत आहे. याकरीता त्याने लोकप्रतिनिधी, अधिकारी व अनेक संस्थेच्या पदाधिकाऱ्यांशी र्पक केला मात्र त्याठिकाणी त्याला कमालीची अनास्था आढळून आी. एका लोकप्रतिनीधीने तर त्याला भेटही नाकारली यावरून या अनास्थेविष कल्पना येवू शकेल.

...रून पाडताच्या मदताच प्रत्यक सभव प्रयत्न केले जात आहे. त्यांनी सांगितले मदत शिबिराच्या देखभालसाठी स्वतंत्र नोडल अधिकारी नियुक्त करण्यात आले.

राज्याचे अप्पर पुलिस महासंचालक (कायदा-सुव्यवस्था) अरुण कुमार ...

### वरूणला मदतीची आवश्यकता....

वरूणच्या घरची परिस्थीती हालाखिची आहे. त्याचे वडील सेवानिवृत्त झाले. घरी वडीलांसह आई व दोन भाऊ आहेत. मोठा भाऊ एका किराणा दुकानात काम करतो तर लहान बी.ए करीत आहे. तो सदैव वरूण ला ने-आण करण्यासाठी वरूण सोबत असतो. एकट्या वरूण ने आपल्या कडील असलेल्या थोड्या-फार पैशातून ३० हजार रूपये जमा केले व पेटेंट मिळविण्यासाठी खर्च केला मात्र आजही त्याला आपल्या या अविष्काराला पुढे नेण्यासाठी मदतीची व मानवी सहकार्याची आवश्यकता आहे. वरूण ला मदत व त्याचे अभिनंदन करण्यासाठी त्याचा संपर्क क्रमांक आहे. ९९७५६४२८०३

## *(पान १ वरुन) महिला व बालकाच्या...*

परंतु डॉ.अमीत पाटील तेथे पोहोचले नाही. या महिलेला वेदना वाढल्याचे परिचारीकेने रात्री १२.३० वाजता डॉ. अमीत यांना फोनद्वारे कळविले. तीन ते

**नवी दिल्ली, दि.१३**

पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या आर्थिक सल्लागार समितीने शुक्रवारी विद्यमान व्यावसायिक वर्षासाठी विकास दराचा अनुमान घटवून ५.३ टक्के करण्यात आला. तो आधी ६.४ टक्क्यांवर ठेवला होता.

पंतप्रधानच्या आर्थिक सल्लागार समितीचे अध्यक्ष सी. रंगराजन यांनी सांगितले की, देशाच्या सकल घरेलू उत्पादन (जीडीपी) विकास २०१३-१४ मध्ये ५.३ टक्के दराशी होईल.

एप्रिलमध्ये करण्यात आलेल्या घोषणेत समितीने विकास दराच्या अनुमानाला ६.४ टक्के ठेवला होता. २०१२-१३ मध्ये विकास दर पाच टक्के राहिला होता.

रंगराजन यांनी येथे एका पत्रका परिषदेत सांगितले की, कृषि क्षेत्राच विकास ४.८ टक्के दर असण्याच अनुमान आहे, त्याचा विकास गेल्य व्यावसायिक वर्षात १.९ टक्के दरान झाला.

ते म्हणाले, "वेळेआधी आणि उत्तम मान्सूनच्या रोपाईवर खूप सकारात्मक परिणाम झाला. जलाशयांची स्थिती १० वर्षात सरासरी २९ टक्के राहिला. त्यामुळे खरीप आणि रब्बी दोन्ही पिके खूप चांगले राहण्याचा अंदाज आहे. ते म्हणाले, विनिर्माण, खनन, वीज, गॅस, पाणीपुरवठा आणि निर्माण उद्योग क्षेत्रात २.७ टक्के विकास दराची आशा आहे. तो गेल्य व्यावसायिक वर्षात २.१ टक्के होता.

## बस अग्निकांडप्रकरणी ती

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

INTELLECTUAL
PROPERTY **INDIA**
PATENTS | DESIGNS | TRADE MARKS
GEOGRAPHICAL INDICATIONS

क्रमांक : 022114623
SL No :

सत्यमेव जयते

भारत सरकार
GOVERNMENT OF INDIA
पेटेंट कार्यालय
THE PATENT OFFICE

# पेटेंट प्रमाणपत्र
# PATENT CERTIFICATE

(Rule 74 Of The Patents Rules)

| | | |
|---|---|---|
| पेटेंट सं. / Patent No. | : | 375568 |
| आवेदन सं. / Application No. | : | 1633/MUM/2012 |
| फाइल करने की तारीख / Date of Filing | : | 02/06/2012 |
| पेटेंटी / Patentee | : | VARUN MADHUKAR KHADARE |

प्रमाणित किया जाता है कि पेटेंटी को उपरोक्त आवेदन में यथाप्रकटित AUTOMATED SHIP SAFETY APPARATUS RUNNING ON PASSIVE ENERGY नामक आविष्कार के लिए, पेटेंट अधिनियम, १९७० के उपबंधों के अनुसार आज तारीख 2nd day of June 2012 से बीस वर्ष की अवधि के लिए पेटेंट अनुदत्त किया गया है।

It is hereby certified that a patent has been granted to the patentee for an invention entitled AUTOMATED SHIP SAFETY APPARATUS RUNNING ON PASSIVE ENERGY as disclosed in the above mentioned application for the term of 20 years from the 2nd day of June 2012 in accordance with the provisions of the Patents Act,1970.

THE PATENT OFFICE ★ GOVT.OF INDIA

अनुदान की तारीख : 26/08/2021
Date of Grant :

पेटेंट नियंत्रक
Controller of Patent

टिप्पणी - इस पेटेंट के नवीकरण के लिए फीस, यदि इसे बनाए रखा जाना है, **2nd day of June 2014** को और उसके पश्चात प्रत्येक वर्ष में उसी दिन देय होगी।

Note. - The fees for renewal of this patent, if it is to be maintained will fall / has fallen due on 2nd day of June 2014 and on the same day in every year thereafter.

Scanned with CamScanner

सत्यमेव जयते

# UNIQUE DISABILITY ID

Government of India

**नाम / Name**

वरुण मधुकर खंडारे

Varun Madhukar Khandare

**UD ID**

MH0720619840257438

**Disability Type**

Locomotor Disability



(P)

| Year of Birth | Percentage of Disability |
| --- | --- |
| 1984 | 80% (Eighty Percent) |

| Date of Issue | Valid upto |
| --- | --- |
| 15/07/2021 | Permanent |

Issuing Authority Sign

068/ B/ 0012439

Scanned with CamScanner

# UNIQUE DISABILITY ID

Government of India

**State ID:** NA

**Aadhaar No:** *********9596

**Address of Card issuing Authority**

Civil Surgeon General Hospital, Irwin Chowk, -
444602

068/ B/ 0012439

Scanned with CamScanner